नोटिस बोर्डवर (?)

# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## शहर विकास विभाग
## जाहिर सुचना
## महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये

जा. क्र. ठामपा/शविवि/वियोअंक/ २७३० दिनांक २८/०२/२०१९

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस/१२९७/१३१९/सी. आर-१४८/९७/नवि-१२, दि. ४ ऑक्टोबर, १९९९ अन्वये मंजूर असून, २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली. तसेच सुधारीत विकास योजनेतील वगळलेले क्षेत्र (Excluded portion) शासन निर्णय क्र. टिपीएस / १२०१/ २७४/ सीआर-२८/२००१/नवि-१२, दि. ३ एप्रिल, २००३ अन्वये मंजूर झाली असून दि. १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे.)

आणि ज्याअर्थी, ठाणे शहराच्या मंजूर विकास योजनेतील सेक्टर क्र. ८ अंतर्गत मौजे कळवा येथील स. नं. ४२५पै., ४२७पै. या भूखंडावर विकास योजना आरक्षण सुचीनुसार MSRTC आ.क्र. १ चे एकुण क्षेत्र २५१००.०० चौ.मी. इतके दर्शविलेले असून, सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण MSRTC आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त MSRTC आरक्षण क्र. १ ह्या आरक्षणात एस.टी. महामंडळाच्या आगारासह सार्वजनिक वापर, सार्वजनिक पार्किंग / वाणिज्य वापर करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये "MSRTC आ.क्र. १ ऐवजी MSRTC डेपो/ सार्वजनिक वापर, सार्वजनिक पार्किंग / वाणिज्य वापर" असे नामाधिमान करणेस आणि त्याचे समुचित प्राधिकरण MSRTC आणि ठाणे महानगरपालिका असा फेरबदल करणे आवश्यक आहे. (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधिले आहे) व अशा फेरबदलाची कार्यवाही करणेस मा. महासभा ठराव क्र. ५१६, दि. १९/११/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) मधील तरतूदीनुसार "उक्त मंजुर विकास योजनेत उक्त फेरबदलाबाबत" जनतेच्या सुचना / हरकती मागविणेसाठी ही जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे. उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा सहायक संचालक नगर रचना, शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका, "महापालिका भवन", सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचे कार्यालयीन सुचना फलकावर तसेच खाली नमूद संकेत स्थळावर ठेवण्यात आला आहे. उक्त फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तीस सुचना / हरकती घ्यावयाची असल्यास त्यांनी हि सूचना वृत्तपत्रात व www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर आणि महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन ३० (तीस) दिवसांचे आत आपली सूचना / हरकत महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे सादर करावी.

(श्रीकांत मा. देशमुख)
सहायक संचालक नगर रचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE
ठाणे महानगर पालिका

ठाणे, दिनांक : २०१९

# मंजुर सुधारित विकास योजना, ठाणे

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

संदर्भ क्र. ठा.म.पा. /शविवि/वियोअंक        दि.

गांव काळ्वा    प्रभाग ८ सि.स.नं/ स.न./ ग.नं. ४२५ पै - ४२८ पै




टिप: केंद्र शासनाच्या दि. १९.०२.१९९१ च्या कोस्टल मॅनेजमेन्ट रेग्युलेशनच्या अधिसुचनेस अधिन राहून

| | | | |
|---|---|---|---|
| | स.नं./ गट नं. हद्द | | कमी घनता रहिवास विभाग |
| | रहिवास विभाग | | [illegible] |
| | वाणिज्य विभाग | | ठा.म.पा. हद्द |
| | औद्योगिक विभाग | | प्रस्तावित फेरबदल |
| | सार्वजनिक व निमसार्वजनिक | | नियोजित रस्ते |
| | हरित विभाग | | दाट लोकवस्ती हद्द |
| | मनोरंजनात्मक | | औद्योगिक विभागाचे रहिवास विभागात रूपांतर |
| | वहातुक व दळणवळण | | रासायनिक कारखान्यापासून प्रथम पट्टा व द्वितीय पट्टा |
| | सार्वजनिक उपयुक्तता | | गोडावुन झोन |
| | जलाशय | | वाईड प्लॅन हद्द |
| | जंगल रिकीएशनल टुरिस्ट झोन | | टि. पी. स्कीम नं. १ हद्द |

नकाशा तयार करणार

नकाशा तपासणार

प्रमाण - १ : ५००० 

शहर विकास व नियोजन अधिकारी,
शहर विकास विभाग
ठाणे महानगरपालिका, ठाणे.